भक्तशिरोमणी हनुमान!

श्रीरामाच्या बरोबर सतत उपस्थित असणारे हनुमान हे प्राणाचे दृश्य स्वरूप आहे. हनुमान ही देवता आहे, तिची उपासना करता येते. तथापि हनुमंताच्या मूर्तीवर एक बुटकुलं तेल ओतल्याने उपासना होत नाही. हनुमंत तसेच शनिदेवता हा वात नियंत्रित करणाऱ्या देवता आहेत. 'प्राण' ही शक्ती-संकल्पना समजून यावी म्हणून मारुतीरायाचा अवतार उपयोगी आहे.

हनुमान भक्तशिरोमणीही होते. सुग्रीव, बिभीषण वगैरे सर्वच श्रीरामांच्या आज्ञेत होते. श्रीरामांच्या राज्याभिषेकानंतर ते त्यांच्या आज्ञेनुसार आपापल्या राज्यांत परत गेले, श्रीरामांच्या इच्छेनुसार आपापले काम करू लागले परंतु हनुमान श्रीरामांबरोबर अयोध्येत गेले. श्रीरामांची कथा सांगितली जात असताना, गायन केले जात असताना त्या ठिकाणी एक आसन मोकळे ठेवलेले असते. हे आसन हनुमंताचे असते. यातूनही हेच निश्चित होते की श्रीरामांचे अवतारकार्य सुरू असताना परमभक्त हनुमान सतत त्याच्या गुरुचरणाशी असे, त्यांना सोडून कधीही जात नसे.

राम तेथे हनुमान असे म्हटले जाते. राम ही जाणीव, परमेश्वरी सत्ता, जीवनशक्ती असली तर त्याच्याबरोबरीने प्राण असावाच लागतो. प्राण रामाच्या पाठोपाठ फिरत असतो, तो रामाच्या बरोबर फिरत असतो, तो रामाशी सतत जवळीक ठेवून असतो. त्यामुळे मृत व्यक्तीला प्राणवायू देऊन जिवंत करता येत नाही. गेलेल्या प्राणाचे पुन्हा आवाहन करता येत नाही.

हनुमान हे प्राणाचे अवताररूप. प्राण दिसत तर नाही, परंतु तो हवेच्या घोड्यावर स्वार होऊन कार्य करत असतो, शरीरात प्रवेश करतो, शरीराच्या बाहेर जातो. असे असले तरी हवा म्हणजे प्राण नव्हे. प्राण हवेवर आरूढ झालेला असतो. शरीरात असणाऱ्या दिव्य चेतनाशक्तीला वा जीवनशक्तीला प्राण म्हणायला हरकत नाही. श्रीरामांच्या बरोबर सतत उपस्थित असणारे हनुमान हे त्या प्राणाचे दृश्य स्वरूप आहे असे म्हणायला हरकत नाही. हनुमान ही देवता आहे, तिची उपासना करता येते. पण ही हनुमंताच्या मूर्तीवर एक बुटकुलं तेल ओतल्याने ही उपासना होत नाही. हनुमंत तसेच शनिदेवता हा वात नियंत्रित करणाऱ्या देवता आहेत. शरीरातील वात बिघडला तर शरीराला तेलाचा अभ्यंग करणे हा उपाय उत्तम लागू पडतो. पक्षाघातासारख्या गंभीर वातविकारावर सुद्धा तेलाचा मसाज करून शरीरात पुन्हा प्राणाचे आवाहन करता येते. असंतुलित असलेला वायू प्राणाला नाकारतो. आणि वायूला संतुलित करण्याने पुन्हा प्राणाचे आकर्षण करता येते. म्हणून तेल व हनुमंत यांचा तसेच तेल व शनिदेवतेचा संबंध दाखविला जातो. अर्थात बाह्यशिलेवर तेल ओतण्याच्या उपायाबरोबरच आपल्या शरीराला अभ्यंग केला किंवा त्या देवतेला प्रिय असणाऱ्या रुईच्या फुला-पानांचा शेक केला तर वात नियंत्रणात येतो आणि शरीरात प्राणसंचार पुन्हा व्यवस्थित चालू लागतो.

'मनासि टाकिले मागे, गतीसी तुळणा नसे' असे हनुमंताचे वर्णन केलेले आहे. मनाची गती अतिजलद असते. विचार मनात येतो न येतो तोच मन हजारो योजने दूर असलेल्या स्थानावर जाऊन पोचते. या मनाला योग्य शिक्षण मिळालेले असले, त्यात तशी शक्ती असली तर ते त्या ठिकाणचे दृश्य प्रत्यक्ष पाहू शकते. असा अनुभव सांगणारे काही भेटतात. या मनाच्या गतीला मागे टाकणारी हनुमंत ही देवता. म्हणजे हनुमंताची गती अफाट आहे याचा अर्थ असा की तो प्रत्येक क्षेत्रात, प्रत्येक स्थानात, तिन्ही लोकांत, प्रत्येक अणुरेणूत उपस्थित असतो. म्हणजेच त्याची गती ही परमगती असते. तो प्रत्येक ठिकाणी असतोच, फक्त त्याला प्रकट करून घ्यायचे असते. जसे चुंबकीय क्षेत्र प्रत्येक ठिकाणी असतेच, त्यासाठी योग्य व्यवस्था केली की ते प्रकट होते व त्यातून मनुष्याला कार्य करून घेता येते, तेथे हालचाल उत्पन्न होते. या हालचालीचा उपयोग करून घेऊन अनेक गोष्टी करता येतात; तसेच हनुमंताची उपासना करून शिव-शक्तीच्या मीलनाने जीवन सार्थक करावे लागेल.

हनुमंताची उपासना ही प्राणशक्तीची उपासना होय आणि प्राणशक्तीची उपासना ही हनुमंताची उपासना होय. हनुमंतरायाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यासाठी वेगवेगळे मंत्र म्हटले जातात. यात भीमरूपी महारुद्रा हे स्तोत्र, हनुमान चालिसा, हनुमान बाण वगैरेंचा समावेश आहे. यांचे पठण केल्याने हनुमंत प्रसन्न होऊ शकतात. हे मंत्र-स्तोत्र संगीतबद्ध करून शुद्ध, स्पष्ट उच्चारांसकट गायल्याने श्वासाची गती नियंत्रित होते व त्यामुळे देवता प्रसन्न होऊन ईप्सित कार्य होऊ शकते.

लोक म्हणतात रावणाला मारण्यासाठी रामअवतार झाला. वास्तविक पाहता रावणाला मारणे हे काम फार मोठे नव्हते, कारण रावणातला प्राण निघून गेल्यावर रावणासारखा रावणही भूमीवर कोसळायला एक मिनिटही लागले नसते. आपल्याला लक्षात घ्यायला हवे की रावण म्हणजे काय व त्याला कसे हरवता येते व एकूण आपल्या जीवनाचा प्रवाहात राम, रावण, सीता, हनुमान पदोपदी आपल्याबरोबर असतात, आपल्यातही त्यांचा अंश असतो. आपल्याला आपल्या जीवनाचे गणित उमगावे या दृष्टीने हे अवतार झालेले असतात. 'प्राण' ही शक्ती-संकल्पना समजून यावी म्हणून मारुतीरायाचा अवतार उपयोगी आहे.

श्रीराम व हनुमंत ही जोडी आहे तसे आपल्या शरीरात आत्मा व प्राण ही जोडी आहे. आपल्या आत्म्याला संतुष्ट करूनच संपूर्ण आरोग्य मिळविता येते. रोग नाही म्हणजे आरोग्य अशी आरोग्याची व्याख्या नाही. तर जीवनात आलेल्या प्रसंगांचा आनंद घ्यायचा असला तर डोळे चांगले पाहिजेत, कान चांगले पाहिजेत, शरीरात कुठेही दुःख नसावे. शरीरात दुःख असले तर आपण कावलेले असतो तेव्हा आनंद कसा काय घेता येणार? तेव्हा आरोग्य मिळविण्यासाठी प्राण व आत्मा यांना नीट ठेवले पाहिजे.

श्रीहनुमानासारखे भक्त भक्तीची व्याख्या सोपी करतात. भक्ती नेमकी कशी करायची, तर हनुमानासारखी. हनुमानाचा अंतरात्मा श्रीराम, लक्ष्मण आणि सीता यांनी इतका व्यापलेला होता, की त्यांच्या हृदयात दुसऱ्या कशाला स्थानच नव्हते. अशा अवस्थेला पोचलेल्या भक्ताला श्रीराम आशीर्वाद देणारच. त्याच्यावर रामकृपा होणारच. आपणही या परमभक्ताची उपासना केली तर त्यांच्या आशीर्वादामुळे मोहमायारूपी सागराला उल्लंघून परमात्म्याने सोपविलेले कार्य पूर्ण करण्यास समर्थ होऊ.

(श्रीगुरू डॉ. बालाजी तांबे यांच्या लेखन, व्याख्यानांतून संतुलन आयुर्वेदद्वारा संकलित)

जोतिबा डोंगर (कोल्हापूर) : दख्खनचा राजा श्री जोतिबाची यात्रा बुधवारी भक्तिमय वातावरणात आणि गुलालाच्या उधळणीत पार पडली. (बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

'ई-केवायसी'साठी पुन्हा मुदतवाढ

■ सकाळ न्यूज नेटवर्क

मुंबई, ता. १ : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील दोन कोटी ४३ लाख लाभार्थीपैकी ६८ लाख लाभार्थींची खाती ई-केवायसी न केल्यामुळे बंद झाली आहेत. ई- केवायसी करण्याची अंतिम मुदत ३१ मार्च होती. या तारखेपर्यंत ई-केवायसी पूर्ण न केलेल्या खातेदारांना पुन्हा मुदतवाढ देण्यात आली असून आता ही मुदत ३० एप्रिल अशी करण्यात आली आहे.

ई केवायसीच्या तपासणीनंतर राज्यात आता केवळ एक कोटी ७५ लाख एवढे लाभार्थी उरले असून यापूर्वी सुमारे दोन कोटी २५ लाख लाभार्थींना दरमहा १५०० रुपये याप्रमाणे सुमारे तीन हजार ७०० कोटी रुपये दिले जात होते. आता लाभार्थींची संख्या कमी झाल्यामुळे एकूण खर्चातही घट होणार आहे. लाडकी बहीण योजनेबाबत करण्यात आलेल्या तक्रारीनंतर ई केवायसी प्रक्रिया सुरू करण्यात अली होती. या योजनेची यापूर्वी पडताळणी केली असता काही ठिकाणी पुरुषही या योजनेचा लाभ घेत असल्याचे आढळून आले होते. तसेच काही सरकारी कर्मचाऱ्यांनीसुद्धा लाभार्थी म्हणून नोंद केल्याचे आढळून आले होते. ई केवायसी या प्रक्रियेला यापूर्वी नोव्हेंबर २०२५, डिसेंबर २०२५ आणि मार्च २०२६ अशी मुदतवाढ देण्यात आली होती. आता ती ३० एप्रिल २०२६ पर्यंत वाढवण्यात आली आहे.

दृष्टिक्षेपात

भारतीय रेल्वेकडून ७६,३५२ विशेष गाड्या

नवी दिल्ली : ''सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात रेल्वेने विक्रमी ७६,३५२ विशेष गाड्या चालवल्या असून सध्या दररोज २५,००० गाड्या धावत आहेत,'' अशी माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी बुधवारी लोकसभेत दिली. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील रेल्वेच्या कामकाजाबाबत ते बोलत होते. ''पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशभरातील रेल्वे विकासासाठी विक्रमी अर्थसंकल्पीय तरतूद केली आहे. गेल्या दशकातील गुंतवणुकीचे फायदे देशभरातील गरीब आणि मध्यमवर्गीयांपर्यंत पोहोचत आहेत,'' असे वैष्णव यांनी सांगितले.

काश्मीरमध्ये दहशतवादी ठार

श्रीनगर : जम्मू-काश्मीरमधील गंदेरबल जिल्ह्यात मंगळवारी रात्री झालेल्या चकमकीत एक दहशतवादी मारला गेला. गुप्तचरांनी दिलेल्या माहितीवरून या भागात लष्कराच्या जवानांनी नाकाबंदी करत शोधमोहीम सुरू होती. यावेळी जवानांना एकेठिकाणी संशयास्पद हालचाल दिसल्यावर दहशतवाद्याला शरण येण्याचे आवाहन करण्यात आले. मात्र, दहशतवाद्याने गोळीबार केल्याने जवानांनी प्रत्युत्तरादाखल गोळीबार केला. या चकमकीत दहशतवादी मारला गेला.

शेकडो बांधकामे काश्मीरमध्ये बेकायदा

जम्मू : ''जम्मू-काश्मीर सरकारच्या पर्यटन विकास प्राधिकरणाने गेल्या तीन वर्षांत ८०७ बांधकामांना परवानगी दिली आहे. केंद्रशासित प्रदेशात ५७८ बेकायदा बांधकामे आढळून आली आहेत,'' अशी माहिती मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांनी दिली. 'पीडीपी'चे आमदार वहीद उर रहमान पारा यांनी विधानसभा प्रश्नोत्तरात विचारलेल्या प्रश्नाला मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले. सन २०२३-२४ मध्ये २४५, २०२४-२५ मध्ये १४७ आणि २०२५-२६ मध्ये ४१५ बांधकामांना परवानगी दिल्याचे अब्दुल्ला म्हणाले.

पश्चिम बंगालमध्ये १.२ कोटी रुपये जप्त

नवी दिल्ली : कोलकता येथे झडतीदरम्यान सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) बुधवारी १.२ कोटी रुपये रोख जप्त केले. ही कारवाई एका कथित गुन्हेगार व त्याच्याशी संबंधित टोळीविरुद्ध सुरू असलेल्या 'मनी लॉंडरिंग' चौकशीचा भाग असल्याचे अधिकृत सूत्रांनी सांगितले. ही कारवाई बिस्वजित पोद्दार ऊर्फ सोना पप्पू याच्याविरुद्ध करण्यात आली आहे.

व्यावसायिक सिलिंडर १९५ रुपयांनी महाग

नवी दिल्ली, ता.१ (वृत्तसंस्था): युद्धामुळे देशातील महागाईच्या झळा देखील तीव्र झाल्या असून सरकारी तेल कंपन्यांनी व्यावसायिक वापरासाठीच्या 'एलपीजी' किमतीत १९५.५० रुपयांची वाढ केली आहे. तत्पूर्वी एक मार्च रोजी सिलिंडरच्या (१९ किलो) दरात ११४.५० रुपयांची वाढ करण्यात आली होती. नव्या दरवाढीमुळे दिल्लीमध्ये व्यावसायिक एलपीजी सिलिंडरची किंमत २ हजार ०७८.५० रुपयांवर पोचली आहे.

या दरवाढीबाबत केंद्र सरकारने म्हटले आहे की, 'आंतरराष्ट्रीय बाजारातील दरवाढ आणि जागतिक पुरवठ्यातील अडथळे यामुळे ही वाढ करण्यात आली आहे. उद्योग आणि हॉटेल क्षेत्रात वापरण्यात येणाऱ्या व्यावसायिक एलपीजी सिलिंडरचे दर नियंत्रणमुक्त (डिरेग्युलेटेड) असून ते बाजारपेठेनुसार ठरविले जातात आणि दरमहा त्यात बदल केला जातो. देशातील एकूण एलपीजी वापरात या सिलिंडरचा वाटा दहा टक्क्यांपेक्षा कमी आहे.'

अशीही दरवाढ

- व्यावसायिक एलपीजी (१९ किलो)
- नवी किंमत : २ हजार ७८ रुपये
- वाढलेली किंमत : १९५.५० रुपये
- आधीची किंमत : १,८८३ रुपये
- आधीची वाढ (मार्च १) : ११४.५० रुपये

विमानाचे इंधन (एटीएफ- जेट फ्युएल)

- नवी किंमत : २ लाख ७ हजार ३४१.२२ प्रति किलोलीटर
- वाढीव किंमत : १ लाख १० हजार ७०३.०८ प्रति किलोलीटर
- वाढ टक्क्यांत : ११४.५

कारण काय?

एक एप्रिलपासून लागू झालेल्या दरवाढीस सौदी करार दरातील ४४ टक्क्यांची वाढ कारणीभूत असल्याचे मंत्रालयाने म्हटले आहे. हा दर मार्चमध्ये ५४२ डॉलर प्रति टन होता, तो एप्रिलमध्ये ७८० डॉलरवर गेला आहे.

ग्राहकांचे संरक्षण

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या आश्वासनानुसार घरगुती ग्राहकांचे संरक्षण कायम ठेवण्यात आल्याचे मंत्रालयाने म्हटले आहे. घरगुती सिलिंडरची (१४.२ किलो) किंमत ९१३ रुपये कायम असून त्यात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेअंतर्गत लाभार्थ्यांसाठी ही किंमत ६१३ रुपये कायम आहे.

कंपन्यांना फटका

३८० रुपये प्रति सिलिंडर नुकसान

४०,४८४ कोटी रुपये मे अखेरपर्यंत अपेक्षित तोटा

६० हजार कोटी मागील वर्षीचा तोटा

'इंडिगो'चा प्रवास महागणार

इंधनाचे दर वाढल्याने 'इंडिगो' कंपनीने देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय उड्डाणांवरील इंधन अधिभारात २७५ ते १० हजार रुपयांपर्यंतची वाढ करण्याची घोषणा केली आहे.

नव्या आर्थिक वर्षाचे तेजीने स्वागत

'सेन्सेक्स' ११८६ अंशांनी, तर 'निफ्टी' ३४८ अंशांनी वधारला

मुंबई, ता. १ : अमेरिक-इराण युद्ध संपण्याबाबत अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सकारात्मक विधान केल्यामुळे आज जगातील सर्वच शेअर बाजारांप्रमाणे भारतीय शेअर बाजारांनीही जोरदार उसळी घेतली. दोन्ही निर्देशांक दीड टक्क्यापेक्षा जास्त वधारले. 'सेन्सेक्स' ११८६.७७ अंशांनी, तर 'निफ्टी' ३४८ अंशांनी वाढला. नव्या आर्थिक वर्षाचे स्वागत बाजाराने तेजीने केल्याने गुंतवणूकदारांमध्येही उत्साह दिसून आला.

सकाळी शेअर बाजारांची सुरुवात जोरदार झाली. कालच्या बंद भावापेक्षा 'सेन्सेक्स' १७०० अंश नफा दाखवीत उघडला. थोड्याच वेळात तो ७४ हजारांच्या आसपास गेला होता. मात्र, तेथून हळूहळू नफावसुली झाली आणि दिवसअखेर 'सेन्सेक्स' ७३,१२४.३२ अंशांवर, तर 'निफ्टी' २२,६७९.४० अंशांवर स्थिरावला.

आजच्या तेजीमुळे शेअर बाजारातील सर्व गुंतवणूकदारांच्या एकूण सर्व मालमत्तेचे मूल्य दहा लाख कोटी रुपयांनी वाढले. काल ते ४१२ लाख कोटी रुपये होते, तर आज ते ४२२ लाखकोटी रुपये झाले. गेल्या दोन दिवसांचा तोटा आज संपुष्टात आल्याने गुंतवणूकदारांमध्ये आनंदाचे वातावरण होते. आज ३,६७५ शेअरचे भाव वाढले, ४७८ शेअरचे भाव कमी झाले, तर ९० शेअरचे भाव कालच्या एवढेच राहिले. आज रुपया स्थिर राहिला आणि कच्च्या तेलाचे भावही कमी झाले. यामुळेही बाजारात आनंदाचे वातावरण होते.

आज १६ पैकी १५ क्षेत्रे नफ्यात होती. केवळ औषधनिर्मिती क्षेत्र एक टक्का तोटा दाखवत होते. संरक्षण क्षेत्र पाच टक्के वाढले, तर कॅपिटल गुड्स, प्रसार माध्यमे, सरकारी बँका हे निर्देशांक तीन टक्के वाढले. वाहननिर्मिती, आयटी, धातूनिर्मिती, बांधकाम व्यवसाय, एफएमसीजी, दूरसंचार, खासगी बँका हे निर्देशांक एक ते दोन टक्के वाढले. शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, डेल्हिवरी हे वाहतूक साठवणूक क्षेत्राचे शेअर वाढले; तसेच गार्डनरिच, बीईएल हे संरक्षण विषयक शेअरही वाढले.

आज 'सेन्सेक्स'मध्ये ट्रेंटचा शेअर सर्वांत जास्त म्हणजे सात टक्के वाढला. इंडिगो, अदानी पोर्ट यांचे शेअरही सहा टक्क्यांच्या आसपास वाढले. बीईएल साडेचार टक्के, तर स्टेट बँक चार टक्के वाढला. एटरनल, लार्सन अँड टुब्रो, टायटन, एशियन पेंट, ॲक्सिस बँक, महिंद्र आणि महिंद्र, इन्फोसिस, बजाज फायनान्स, रिलायन्स इंडस्ट्रीज, मारुती, टाटा स्टील, टीसीएस या शेअरचे भावही वाढले.

नद्या प्रदूषण रोखण्यासाठी प्राधिकरण

मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय; दोन हजार कोटींचा निधी उभारणार

मुंबई, ता. १ : राज्यातील नद्यांचे प्रदूषण कमी करणे आणि नदी संवर्धन-पुनरूज्जीवन करण्यासाठी नियामक आणि विकासात्मक अशी दोन्ही कामे करण्यासाठी महाराष्ट्र राज्य नदी पुनरूज्जीवन प्राधिकरण स्थापन करण्यास आज झालेल्या राज्याच्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेच्या धर्तीवर राज्यात स्थापन करण्यात येणाऱ्या या प्राधिकरणाच्या अध्यक्षपदी मुख्यमंत्री राहणार असून उपाध्यक्षपदी पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री असतील. वित्त मंत्री, नगरविकास मंत्री, जलसंपदा मंत्री, उद्योग मंत्री, ग्रामविकास व पंचायतीराज मंत्री या प्राधिकरणाचे सदस्य म्हणून काम पाहणार आहेत.

प्राधिकरणासाठी आवश्यक दोन हजार कोटींचा निधी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या माध्यमातून उभारण्यास आणि शासनाचे योगदान म्हणून १०० कोटींचा निधी देण्यास आजच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. गौण खनिज उत्खननातून मिळणाऱ्या रकमेच्या १० टक्के इतका निधी दरवर्षी प्राधिकरणास देण्यास मान्यता देण्यात आली. याशिवाय विविध कंपन्यांकडून मिळणारा सामाजिक दायित्व निधी, विविध वित्तीय संस्थांकडून होणारा मिश्र वित्त पुरवठा या माध्यमातून प्राधिकरणासाठी निधी उभारला जाणार आहे. राज्यातील प्रदूषित ५४ नद्यांच्या पुनरूज्जीवनासाठी टप्प्याटप्प्याने प्राधान्यक्रम निश्चित करण्यात येणार असून विविध योजनांचे एकत्रिकरण करून पूरक धोरणांची म्हणजेच सांडपाणी प्रक्रिया, औद्योगिक सांडपाण्यासंबंधात उपाययोजना, अतिक्रमणे रोखण्यासाठी नदीकाठचे क्षेत्र निश्चित करण्यासाठी शिफारस करेल. नदी खोरे व्यवस्थापन आराखडे तयार करणे, त्यांची अंमलबजावणी करणे, भूसंपादन, अतिक्रमणे, वीजपुरवठा आणि करारांचे प्रश्न सोडविण्याची जबाबदारी या प्राधिकरणाकडे असेल. प्राधिकरणात पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्य कार्यकारी समिती तसेच एक स्वतंत्र सचिवालयही काम करणार आहे. या सचिवालयात विविध स्वयंसेवी संस्था, पर्यावरण व जैवविविधता क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांचाही समावेश असणार आहे.

या नद्यांच्या स्वच्छतेवर भर

■ **भारतातील १० प्रमुख नद्यापैकी नर्मदा, तापी, गोदावरी व कृष्णा या चार नद्या महाराष्ट्रात आहेत. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने २०२५ मध्ये प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार देशभरात २९६ प्रदूषित नदी-पट्टे असून त्यापैकी सर्वाधिक म्हणजे ५४ प्रदूषित नदी-पट्टे महाराष्ट्रात आहेत. यात मिठी, काळू, मुळा, मुळा-मुठा, मुठा, भीमा, पवना, नाग, चंद्रभागा, पंचगंगा या नद्यांचा समावेश आहे. या नद्यांचे प्रदूषण-पुनरूज्जीवन याबाबत हे प्राधिकरण निर्णय घेणार आहे.**

जीएसटी महसूल दोन लाख कोटींवर

नवी दिल्ली, ता. १ : मार्च महिन्यात देशातील एकूण जीएसटी संकलन दोन लाख कोटी रुपयांहून अधिक (२,००,०६४) कोटी रुपये) झाले असून, त्यात वार्षिक तुलनेत सुमारे नऊ टक्क्यांनी वाढ झाली आहे. आयात; तसेच देशांतर्गत विक्री आणि खरेदीतून झालेल्या करसंकलनाच्या बळावर, आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील हे तिसरे सर्वोच्च मासिक संकलन ठरले आहे.

मार्च २०२५ मध्ये एकूण जीएसटी संकलन १.८३ लाख कोटी रुपये इतके होते, तर एप्रिल २०२५ मध्ये आतापर्यंतचा सर्वाधिक २.३६ लाख कोटी रुपयांहून अधिक जीएसटी महसूल नोंदवला गेला होता, त्यानंतर मे महिन्यातील संकलन २.०१ लाख कोटी रुपयांसह दुसऱ्या क्रमांकावर होते. मार्च महिन्यात एकूण देशांतर्गत महसूल ५.९ टक्क्यांनी वाढून १.४६ लाख कोटी रुपयांहून अधिक झाला, तर आयातीतून मिळणारा महसूल १७.८ टक्क्यांनी वाढून ५३,८६१ कोटी रुपयांवर पोहोचला.

क्लीनर, ट्रकचालक ते पीएचडी

बीडमधील भारत सोळंकेंचा जिद्दी प्रवास

पुणे, ता. १ : ''दहावीनंतर घरची परिस्थिती इतकी वाईट होती, की शिक्षण सोडून ट्रकवर क्लीनर म्हणून काम सुरू केलं. पुढं चालक झालो; पण गाडी चालवत असतानाही पुस्तकं कधी सोडली नाहीत. रात्री गाडी थांबली, की वाचन करायचो, कविता लिहायचो. लोकांना माझ्या कविता माझ्याच आहेत यावर विश्वास बसत नव्हता, तेव्हा मनाला लागलं आणि ठरवलं. आपण शिकायचंच. त्या जिद्दीवर पुन्हा शिक्षण सुरू केलं आणि आज पीएचडी पूर्ण केली,'' हे सांगत होते, सादोळा (ता. माजलगाव, जि. बीड) येथील भारत सोळंके.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत दहावीपर्यंतचे शिक्षण घेऊन दहा वर्षे ट्रक चालवणाऱ्या भारत सोळंके यांनी शिक्षणाच्या ओढीच्या जोरावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून मराठी विषयात पीएचडी मिळवून एक प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले आहे. सादोळा या छोट्याशा गावातून आलेल्या भारत सोळंके यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळेतच झाले. घरच्या अत्यंत बिकट आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना दहावीनंतर शिक्षण सोडावे लागले. ट्रकवर क्लीनर म्हणून काम सुरू केले आणि पुढे ट्रकचालक म्हणून महाराष्ट्र व गुजरातभर प्रवास करत दहा वर्षे कष्टाची वाट चालली. मात्र, या काळातही शिक्षणाची ओढ त्यांनी सोडली नाही. रात्रीच्या विश्रांतीत वाचन करण्याची सवय त्यांनी कायम ठेवली. स्वतः कविता लिहिण्याची आवडही त्यांना होती. याच आवडीमुळे 'आपण शिकले पाहिजे' हा निर्धार त्यांनी केला.

भारत सोळंके

आर्थिक अडचणींवर मात

■ **यानंतर त्यांनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातून पदवीचे शिक्षण पूर्ण केले. पुढे स्वतःचा छोटा टेंपो घेऊन व्यवसाय करत शिक्षणासाठी पैसे साठवले. मात्र उच्च शिक्षणासाठी त्यांनी तो टेंपोही विकला आणि २०१७ मध्ये पुण्यात येत फर्ग्युसन महाविद्यालयात एम.ए.चे शिक्षण घेतले. आर्थिक अडचणींवर मात करत त्यांनी महाविद्यालयात काम करत शिक्षण पूर्ण केले. एम.ए.नंतर त्यांना पुणे विद्यापीठात पीएचडीसाठी प्रवेश मिळाला. 'कुसुमाग्रज व गुलजार यांच्या कवितेचा तौलानिक अभ्यास' हा त्यांचा संशोधन विषय असून प्राचार्य डॉ. संजय नगरकर यांनी त्यांना मार्गदर्शन केले. सारथी संस्थेच्या शिष्यवृत्तीमुळे त्यांना संशोधन पूर्ण करण्यास मोठी मदत झाली.**

"दररोज १२ ते १४ तास अभ्यास करत होतो. ट्रक चालवत असतानाही मी वाचन कधी सोडले नाही. परिस्थिती कितीही कठीण असली तरी शिक्षणानेच आयुष्य बदलते, हा माझा विश्वास आहे. पुण्यात आल्यानंतर मला शिक्षकांची मोठी साथ मिळाली.

- डॉ. भारत सोळंके

एनईएस धाराशिव ट्रान्समिशन लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: एम 130-131, दुसरा मजला, एम-42, कनॉट सर्कल, शंकर मार्केट, ब्लॉक एम, कनॉट प्लेस, नवी दिल्ली – 110001

सीआयएन: U42202DL2025G01445416

जाहीर सूचना

एनईएस धाराशिव ट्रान्समिशन लिमिटेडच्या ट्रान्समिशन परवाना मंजुरीसाठीच्या अर्जावरसूचना/हरकती मागविणे (प्रकरण क्र. 49/2026)

1. एनईएस धाराशिव ट्रान्समिशन लिमिटेड यांनी विद्युत अधिनियम, 2003 मधील कलम 14 व 15 तसेच एमईआरसी (पारेषण परवाना अटी) नियमावली, 2004 अंतर्गत महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे ट्रान्समिशन परवाना मंजुरीसाठी अर्ज दाखल केला आहे. सदर अर्ज आयोगाने दिनांक 30 मार्च 2026 रोजी ग्राह्य धरला असून, विद्युत अधिनियम, 2003 च्या कलम 15(2) अंतर्गत एनईएस धाराशिव ट्रान्समिशन लिमिटेड यांना सार्वजनिक सूचना प्रसिद्ध करण्याचे निर्देश दिले आहेत.
2. एनईएस धाराशिव ट्रान्समिशन लिमिटेड ही कंपनी अंतर्गत राज्य ट्रान्समिशन प्रणाली उभारण्यासाठी विशेष उद्देश वाहन म्हणून स्थापन करण्यात आली आहे, ज्यामुळे नूतनीकरणीय ऊर्जेचा वीज पुरवठा सुरळीत व कार्यक्षम पद्धतीने वहन व प्रसारण होऊ शकेल. सीटीयुजायएल नुसार सुमारे 7 जीडब्ल्यू सौर ऊर्जेच्या अपेक्षित निर्मितीचा विचार करून ही प्रणाली उभारण्यात येत आहे. 400 केव्ही वाशी पूलिंग उपकेंद्र हे आगामी आरई निर्मिती पुणे व मुंबई येथील लोड सेंटर्सकडे वहन करण्यासाठी नियोजित करण्यात आले आहे, विशेषतः एआयएस वाशी हे पाटोदा, परांडा, भूम व कळंब या आरई समृद्ध क्षेत्रांचे मध्यबिंदू असल्याचा विचार करून. सदर प्रकल्प महाराष्ट्र शासनाने निविदा प्रक्रिया समन्वयक म्हणून अधिसूचित केलेल्या पीएफसी कन्सल्टिंग लिमिटेड यांच्या मार्फत राबविण्यात आलेल्या टॅरिफ आधारित स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेद्वारे प्रदान करण्यात आलेला आहे.
3. सदर प्रकल्पामध्ये 400 केव्ही स्तरावर 2x500 एमव्हीए, 400/220 केव्ही आयसीटी आणि 2x315 एमव्हीए, 400/132 केव्ही आयसीटी तसेच 1x125 एमव्हीएआर बस रिॲक्टरसह वाशी उपकेंद्र (एसएस) उभारणीचा समावेश आहे. तसेच संबंधित लाईन्स व बे यांचा समावेश असून, 400 केव्ही डि/सी लाईन 400/220/132 केव्ही एआयएस वाशी (नवीन) ते 765/400 केव्ही एआयएस पुणे (पूर्व) (प्रस्तावित), 220 केव्ही डि/सी लाईन 400/220/132 केव्ही एआयएस वाशी (नवीन) ते 220 केव्ही एआयएस मांजरसुभा (विद्यमान), 220 केव्ही डि/सी लाईन 400/220/132 केव्ही एआयएस वाशी (नवीन) ते 220 केव्ही एआयएस परांडा (विद्यमान), 132 केव्ही डि/सी लाईन 400/220/132 केव्ही वाशी (नवीन) ते 132 केव्ही एआयएस कळंब (विद्यमान) यांचा समावेश आहे. तसेच मांजरसुभा (विद्यमान) व परांडा (विद्यमान) उपकेंद्रांवर 220 केव्ही बे, संबंधित जीआयएस व एआयएस लाईन बे यांसह, 765 केव्ही एआयएस पुणे (पूर्व) (नवीन) (प्रस्तावित) येथे 400 केव्ही लाईन बे (400 केव्ही डि/सी लाईनच्या टर्मिनेशनसाठी) तसेच 132 केव्ही एआयएस कळंब येथे 132 केव्ही लाईन बे (400 केव्ही एआयएस वाशी (नवीन) ते 132 केव्ही एआयएस कळंब (विद्यमान) डि/सी लाईनच्या टर्मिनेशनसाठी) यांचा समावेश आहे.
4. अर्जदारास निविदा प्रक्रियेनुसार यशस्वी बोलीदाराने संपादन केले असून, महाराष्ट्र राज्यामध्ये वरील अंतर्गत राज्य ट्रान्समिशन प्रणालीची उभारणी, संचालन व देखभाल करण्यासाठी ट्रान्समिशन परवाना मिळविणे आवश्यक आहे. त्यानुसार एनईएस धाराशिव ट्रान्समिशन लिमिटेड यांनी ट्रान्समिशन परवाना मंजुरीसाठी अर्ज केलेला आहे.
5. आयोगाने एनईएस धाराशिव ट्रान्समिशन लिमिटेड यांना या सूचनेद्वारे ट्रान्समिशन परवाना मंजुरीसाठीच्या अर्जावर सर्वसामान्यांकडून सूचना/हरकती मागविण्याचे निर्देश दिले आहेत. अर्जाची प्रत पाहणीसाठी किंवा खरेदीसाठी मिळविण्यासाठी संबंधित नोडल व्यक्तीचे तपशील पुढीलप्रमाणे आहेत:

अ. नाव: श्री. वसंत कुमार पटेल

ब. अर्जाची प्रत पाहणीसाठी/खरेदीसाठी मिळविण्याचा पत्ता:

एम 130-131, दुसरा मजला, एम-42, कनॉट सर्कल, शंकर मार्केट, ब्लॉक एम, कनॉट प्लेस, नवी दिल्ली – 110001

क. पाहणी/खरेदीची वेळ: कामकाजाच्या दिवशी सकाळी 10:00 ते सायं. 17:00 दरम्यान

ड. सविस्तर अर्ज दस्तऐवज (इंग्रजीमध्ये) सीडीसह रु. 100/- रोख किंवा "NES Dharashiv